जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८५ दिनांक - ०३/०२/२०२५**

वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## गुन्हेगारांना जेल मधून जामीनावर बाहेर काढण्याकरीता उभे केलेले बनावट जामीनदार व संबंधीत वकील यांचे रॅकेट केले उध्वस्त

पुणे जिल्ह्यातील वेगवेगळया गंभीर गुन्हयात मा.न्यायालयाने जेलमध्ये रवानगी केलेले गुन्हेगारांना कोणी लायक जामीन (Surities) मिळत नसे. त्यांना जामीनदार होण्यास अब्रुदार लोक घाबरत असत. त्यामुळे त्यांना मा.न्यायालयातून जामीन मिळवुन देणेकामी काही वकीलांच्या साथीने एक बनावट जामीनदारांचे रॅकेट निर्माण झाले होते बनावट जामीनदार हे मा.न्यायालयात येणा-या गुन्हेगारांच्या नातेवाईकांना हेरुन त्यांच्याशी आर्थिक व्यवहार करत असत. त्यानंतर नमुद टोळी हे बनावट जामीनदार यांचे दुस-याचे नावाने आधारकार्ड, रेशनकार्ड व ऑनलाईन ७/१२ वरील नावात बदल करुन ते कागदपत्रे तयार करत होते. रेशनकार्ड खरे वाटावे म्हणून त्यावर पुरवठा विभागाचे उपायुक्तांचे रबरी स्टॅम्प मारुन खोटी सही करीत होते. त्याद्वारे त्यांचे प्रतिज्ञापत्र तयार करुन संबधित कोर्टातील सहाय्यक अधिक्षक (नाझर) यांचेकडुन बनावट कागदपत्रे पडताळणी करुन खरे असल्याचे प्रमाणित करायचे.मा. न्यायालया समक्ष जामीनदारांना हजर केल्यावर वकील व बनावट जामीनदार हे खरे असल्याचा आवआणत आणि मा. न्यायालयाची दिशाभुल करुन जेलमधील गुन्हेगारांना जामीन मिळवुन देत असत.

वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीसांना या बनावट जामीनदारांच्या रॅकेटबाबत गोपनिय माहिती मिळाली. त्याआधारे दिनांक ०४/०१/२०२५ रोजी मा. पोलीस उप-आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांचे आदेशान्वये लष्कर कोर्ट आवारात सापळा लावण्यात आला. सापळा यशस्वी झाला. त्यामध्ये इसम नामे संतोषकुमार शंकर तेलंग याचे सह ५ बनावट जामीनदार ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्याचा मुख्य साथीदार हा गर्दीचा फायदा घेऊन पळुन गेला.सदर कारवाई वरुन वानवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ११/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२),३१८(४),३३८,३३६(३),३४० (२),३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करुन सुरूवातीला ६ आरोपी अटक करुन सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास केला गेला.सदरचा तपास चालु असताना अटक आरोपीतांकडून मिळालेल्या माहितीवरुन मुख्य साथीदार हा बनावट व चोरुन रबरी शिक्के तयार करुन देणारा १) **दर्शन अशोक शहा, वय- ४५ वर्षे रा.सोलापुर बाजार, कॅम्प, पुणे यास अटक केली व त्याचेकडुन एकुण ९ रबरी स्टॅम्प व मशिन जप्त केली.एकेरी पानाचे रेशनकार्ड प्राप्त करुन देणारे २) पिराजी उर्फ चंद्रकांत मारुती शिंदे, वय. ६० वर्षे, रा. भारतमाता चौक, मोशी, ता. हवेली ३) गोपाळ पुंडलीक कांगणे, वय.३५ वर्षे, रा.मोरवाडी, पिंपरी कोर्टाचे शेजारी, पिंपरी** यांना दि. ०९/०१/२०२५ रोजी अटक केली सदर गुन्ह्याच्या पोलीस तपासामध्ये अटक आरोपी व पाहिजे आरोपी यांनी मिळुन संगणमताने त्यांचे स्वतःचा आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केली असुन आतापर्यंत त्यांचे ताब्यातुन व घरझडती पंचनाम्यामध्ये एकुण रु. ८९,०२०/- कि. चा मुद्देमाल त्यामध्ये एकुण ९५ संशयित रेशनकार्ड, ११ संशयित पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे वानवडी पोलीस ठाणे, पुणे शहर **Email id:- dcpzone5.pu-**mh@gov.in आधारकार्ड व इतर संशयित कागदपत्रे आणि मोबाईल हन्डसेट, डिओ मोपेड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयातील न्यायालयीन कोठडीतील आरोपी नामे संतोषकुमार शंकर तेलंग याने मा.न्यायालया समक्ष भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १८३ अन्वये दि.१५/०१/२०२५ रोजी कबुली जबाब दिला आहे.त्यामध्ये आरोपीस सदर गुन्हा करण्यामागे मुख्य सुत्रधार व त्याचे सहकारी इसम १) ॲड.असलम सय्यद, २) ॲड.योगेश जाधव व अजुन काही यांचे साथीदारांसोबत संगनमताने करुन बनावट जामीनदार उभे करुन जामीन करणेकामी त्यांनी वेळोवेळी मदत केली व त्याचा मोबदला म्हणून रोख स्वरुपात पैसे दिले आहेत.आरोपीकडुन जप्त केलेले बनावट रेशनकार्ड /आधारकार्ड याद्वारे मा.न्यायालयातुन कोणकोणत्या आरोपीतांना आजपर्यंत जामीन मिळाला व त्याकामी आरोपीतास कोणी मदत केली इत्यादी माहिती मा. न्यायालयाकडुन प्राप्त करण्यात आली आहे. त्यामध्ये मा.न्यायालयातील काही वकीलांचा व कोर्टातील स्टाफचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे त्याप्रमाणे **ॲड.असलम गफुर सय्यद,वय ४५ वर्षे, रा.वैदवाडी, हडपसर व ॲड.योगेश सुरेश जाधव,वय ४३ वर्षे,रा.हडपसर** यांना नमूद गुन्ह्यामध्ये दिनांक ०२/०२/२०२५ रोजी अटक केली आहे. आज रोजी दोन्ही वकील आरोपीतांना मा.न्यायालया समक्ष हजर करणार आहोत सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक धनाजी टोणे वानवडी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

